महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२०/तेवीस

दिनांक : १ ऑगस्ट, २०२३

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा- २०२०, पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाच्या गुणांच्या फेरपडताळणी (Retotalling) करीता अर्ज सादर करण्याबाबत.

संदर्भ :- जाहिरात क्रमांक ०५/२०२० व अधिसूचना क्रमांक २६०/२०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा - २०२० मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गातील पदांचा निकाल राखून ठेवून दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत निकालाद्वारे शिफारसपात्र व ना शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ मधील ‘View Marksheet’ या वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(i) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(ii) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(iii) परीक्षेच्या अर्जात नमूद भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(iv) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(v) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करुन ‘Save’ बटनवर क्लिक करावे.

(vi) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पद्धतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

४. उपरोक्त कार्यपद्धतीनुसार गुणांच्या फेरपडताळीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई